# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया/२०१९/३५६४ दिनांक :- 29 AUG 2019

प्रति,

संचालक/प्राचार्य

व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व विनाअनुदानित संस्था,

पुणे विभाग ,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय व केद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेनंतर रिक्त राहणा-या जागांवर प्रवेश करण्यासंदर्भात सूचना.

संदर्भ :-१) तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१८/९६७ अ दिनांक ३१/७/२०१८

२)या कार्यालयाचे परिपत्रक क्र.जा.क्र. तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया २०१९-२०/२७८९ दिनांक ६/०७/२०१९

३)रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया पुणे शहर यांचे दिनांक २८/०८/२०१९ चे निवेदन

४)महाराष्ट्र नागरी कृती समिती पुणे शहर यांचे दिनांक २८/०८/२०१९ चे निवेदन

५)राष्ट्रवादी विद्यार्थी कॉग्रेस महाराष्ट्र प्रदेश यांचे दिनांक २८/०८/२०१९ चे निवेदन

६)अध्यक्ष,महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना पुणे शहर ,पुणे यांचे दिनांक २९/०८/२०१९ चे निवेदन

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश फे-या संपन्न झाल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेनंतर रिक्त राहणा-या जागांवर व संस्थास्तरीय जागांवर प्रवेश करण्यासंदर्भात संदर्भिय पत्र क्र २ नुसार प्रवेश नियम पुस्तिका मधील नियम पुस्तिका १३,१४,१५ नुसार करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.परंतु, संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या प्रवेशाबाबत संदर्भ क्र ३ ते ६ अन्वये तक्रार वजा निवेदने या कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. शासनमान्य प्रवेश नियम तसेच पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०४ दिनांक २४/०४/२०१७ मधील प्रवेश नियमावलीतील मुद्दा क्रमांक १३ व दिनांक ४/०६/२०१८ रोजीच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक २०२ अन्वये निर्गमित सुधारित प्रवेश नियमावलीतील मुद्दा क्रमांक ९ नुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा,अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेशाची कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली आहे.त्यानुसार आपण प्रवेशाबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर जागांवरील प्रवेशाबाबतचे वेळापत्रक व केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतर शिल्लक राहिलेल्या जागांची संख्या आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

**अगेन्स्ट कॅप मधील जागांवरील प्रवेश करताना प्रवेश नियमावलीचे पालन होत नसलेबाबत सामाजिक संघटना / नागरीकांकडून तक्रारी / निवेदने या कार्यालयास प्राप्त होत आहेत. सदर बाब गंभीर असून प्रवेश करताना प्रवेश नियमावलीतील नियमाचे तंतोतंत पालण करणे अत्याआवश्यक / बंधणकारक आहे. याची सर्व संस्था प्रमूखानी नोंद घ्यावी तसेच या बाबत कोणत्याही तक्रारी / निवेदने या कार्यालयास प्राप्त होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.**

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- मा.आयुक्त राज्य सामाईक परीक्षा कक्ष मुंबई यांना संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई (कार्यासन क्र २ अ) यांचे मार्फत